# 'युमकाल' मधील आदिवासी चळवळ : एक अभ्यास

**डॉ. बी. आर.भोसले**
सहयोगी प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड

★★★

**Abstract** – आदिवासी चळवळ ही भारतातील सामाजिक चळवळीपैकी एक महत्वपुर्ण असलेली चळवळ आहे. 'मागासलेले हिंदु' या नावाने डॉ.घुर्ये यांनी या समुदायातील लोकांचे वर्णन केले आहे. जो एका निश्चित भुप्रदेशावर वास्तव्य करतो. ज्यांचे स्वायत्त शासन असते, बाह्या संस्कृतीपासुन अलिप्त असतो, अशी वैशिष्ट्यो धारण केलेला हा समुदाय असुन या समुदयापैकी अनेक समुदायांनी सामाजिक चळवळी घडवून आणल्या आहेत. स्वतंत्र भारताच्या राज्य घटनेत 'अनुसुचित जमाती' म्हणून यांचा उल्लेख केला जातो.

बस्तर जिल्ह्यातील आदिवासी समुदायांनी घडवून आणलेले आंदोलन आणि त्या आंदोलनाचे स्वरुप या विषीचे लिखाण ज्या ग्रंथात करण्यात आले आहे तो ग्रंथ डॉ.सुधीर सक्सेना यांनी लिहिलेला असून 'युमकाल' असे या ग्रंथाचे नाव आहे. या ग्रंथात बस्तर या प्रदेशातील ज्या आदिवासी जनजातीनी आंदोलन केले आहे त्याचे विवेचन या ग्रंथात आहे. सदरील शोधनिबंध दुय्यम तथ्य संकलनाच्या साधनाचा वापर करुन आदिवासी चळवळी विषयीचे तथ्य प्रस्तुत करण्यासाठी सादर करण्यात आला आहे. या शोधनिबंधात बस्तरमधील कोणत्या आदिवासी जनजातीनी चळवळ केली होती आणि त्याची कारणे कोणती होती या विषयीचे विवेचन आहे. सदरील अध्ययनासाठी 'युमकाल' या ग्रंथाचे निश्चित उद्देष ठेवून वाचन करण्यात आलेले असून यात या चळवळीची पार्श्वभुमी विषद करण्यात आली आहे.

**Key Words** – बस्तरांचल, अरण्यकसंस्कृती, उपनिवेशवाद, महाविपल्व, बेगाड, कबाडी, स्वदेशी सामंत, साम्राज्यवाद, साम्राज्यवादी शक्ती, विद्रोह, सशस्त्र प्रतिकार.

आदिवासी चळवळीचा इतिहास भारतातील सामाजिक चळवळीच्या वैभवामध्ये विशेष महत्व असलेला आहे. भारतातील आदिवासी चळवळींचा इतिहास बघत असताना 'युमकाल' या ग्रंथामध्ये आदिवासी लोकांनी केलेल्या चळवळीचे वर्णन आहे. त्याची नोंद घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही. कारण या ग्रंथात ज्या आदिवासी चळवळी विषयी विवेचन करण्यात आले आहे, ते

विवेचन आणि त्या विवेचनाचा विषय अतिशय महत्वाचा आहे. सुधीर सक्सेना यांनी लिहिलेले 'युमकाल' या नावाचे पुस्तक आदिवासी चळवळीचा जिवंत इतिहास वर्तमान भारतासमोर ठेवतो. भारतामध्ये ज्या वेगवेगळ्या चळवळी घडून आलेल्या आहेत. त्यात आदिवासी चळवळीचा महत्वाचा वाटा राहिलेला आहे. बस्तर या छोट्याशा गावापासुन प्रारंभ झालेल्या या चळवळीत अनेक आदिम समुदाय सहभागी झालेले होते. 'बस्तर इतिहास आणि संस्कृती' या ग्रंथात बस्तरची स्थिती संशोधकाने उपस्थित केली आहे. सदरील शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन साधनाचा वापर करण्यात आला असून लेखी साहित्य, संदर्भ पुस्तके, ग्रंथ आणि अन्य लिखित साहित्याचा वापर करण्यात आला आहे.

बस्तरमधील ज्या आदिवासी जनजाती आहेत. त्यांचा अभ्यास लाला जगदलपुरी या लेखकाने केलेला आहे. बस्तर जिल्हा हा चार संस्कृतीच्या प्रभावा खालील जिल्हा आहे. या जिल्ह्याच्या अवती भोवती छत्तीसगड, आंध्र प्रदेश, ओरीसा आणि महाराष्ट्र या प्रदेशाच्या सिमा आहेत. सिमा आणि संस्कृतीची विविधता असून सुध्दा हा प्रदेश स्वतःची अरण्य संस्कृतीमुळे या जनजातीनी 'बस्तर' आंदोलन घडवून आणले होते. त्याच आंदोलनाचा आढावा या शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

आदिवासी जनतेसाठी वेगवेगळे शब्द वापरले जातात मानवशास्त्रज्ञानी आदिम जनजातीसाठी, जनजाती, आदिवासी, वनवासी, आदिम जाती अशा संज्ञांचा वापर केलेला आहे. ह्या संज्ञा समान अर्थाने वापरल्या जातात. विशिष्ट सांस्कृतिक विशेषता असल्यामुळे आदिवासीची स्वतंत्र ओळख असलेली दिसते. भारतात आदिवासी चळवळीमध्ये संथाल चळवळ, कोल चळवळ, छोटा नागपुर मधील आदिवासी चळवळ, बस्तरची चळवळ, झारखंड आंदोलन बिरसा मुंडा चळवळ, भिल्ल आंदोलन, ताना भगत आंदोलन, बोडो आंदोलन आदि चळवळी महत्वपूर्ण आहेत. या चळवळीनी आदिवासींना एकत्र आणून त्यांच्यामध्ये आत्मभानाची भावना निर्माण केली. या चळवळी स्वातंत्र्य पुर्व कालखंडात घडून आल्या. स्वातंत्र्यानंतर या चळवळीनी नक्षलवादाकडे प्रवास केलेला दिसतो. या चळवळीपैकी महत्वाची मानली जाणारी बस्तर चळवळ आणितिची पार्श्वभुमी अभ्यासणे हा मुख्य हेतु असून आदिवासी चळवळींना जवळून बघणे हा शोधनिबंधाचा हेतु आहे.

'युमकाल' हा ग्रंथ बस्तरमध्ये घडून आलेल्या चळवळीचे वस्तुनिष्ठपणे विवेचन करतो. या ग्रंथात बस्तर मधील आदिवासी आणि त्यांनी घडवून आणलेला विद्रोह याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

बस्तरमधील गदबा, भतरा, राजमुरिया, मुरिया, दंडामी, माडिया, अबूझा माडिया, दोला और हलवा या जनजातीनी बस्तर आंदोलनात सहभाग घेतला होता. याच बरोबर अल्पसंख्याक समुदायातील महारा, धाकड, पनका, सुंडी, कलार, बजारा, क्षत्रिय, ब्राम्हण आणि कायस्थ यांनी सुध्दा या आंदोलनात सहभाग नोंदवला होता. जमिनदार, जहागीरदार

आणि श्रीमंत माणसे मात्र या आंदोलनापासुन अलिप्त राहिली. तत्कालिन बस्तरमधील 46 परगने सहभागी झाली होती. ब्रिटिश शासनाचे या समुदायावर केलेल्या अन्याय, अत्याचारामुळे हे आंदोलन उभे राहिले. ब्रिटिशांना धडा शिकवणे हा या आंदोलनाचा हेतु होता. या आंदोलनात मोठ्या प्रमाणात परंपरागत अवजारांचा वापर करण्यात आला. सामान्य माणुस आणि मागास वर्ग यांनी सुध्दा या चळवळीत सहभाग नोंदवला मात्र या प्रदेषातील संरजामदारानी इंग्रजाना सहकार्य केले. या लोकांनी ब्रिटिशाना सहकार्य करुन साम्राज्यवादाचा भारतात विस्तार केला.

बस्तरमधील जनजातीची एक अरण्य संस्कृती होती. जंगलाविषयी त्यांना आपुलकी होती आणि या संस्कृतीत ब्रिटिशांनी केलेला हस्तक्षेप या जनजातीतील लोकांना मान्य नव्हता. बस्तर मधील आंदोलन 1990 मध्ये घडून आले. ब्रिटिशांनी साम्राज्य विस्ताराबरोबर भारतातील या जनजातीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक कायदे केले.

असाच कायदा 1908 मध्ये ब्रिटिशांनी निर्माण केला. या कायद्यामुळे बस्तर राज्यामधील सर्व जंगले आरक्षित करण्यात आली. जंगल या लोकांचा आत्मा होता आणि त्यांच्या जीवनाचा महत्वपुर्ण आधार होता. या कायद्यामुळे आरक्षित जंगलामध्ये या प्रदेशातील लोकांना प्रवेश सुध्दा नाकारण्यात आला. वनसंपत्ती पासुन त्यांना दुर करण्यात आले. जंगलामध्ये स्वतंत्र नविन जगण्याचा त्यांचा नैसर्गिक अधिकार त्यांच्यापासुन हिरावून घेण्यात आला. यामध्ये राज्यामध्ये शिक्षण अनिवार्य करण्यात आले. लोकांना जबरदस्ती शिक्षण घेण्यासाठी बाध्यकरण्यात आले. शिक्षक हा हुकुमशहा सारखा वागत असे. शिक्षणाचा आंतक या लोकांना सहन झाला नाही. शिक्षणात सहभागी न झालेल्या मुलांना व आई वडीलांना झाडांना उलटे लटकवण्याची शिक्षा दिली जात असे. याच बरोबर अनेक अन्याय, अत्याचार या लोकांवर केले गेले. याचा परिणाम म्हणून इ. स.1910 मध्ये बस्तर आंदोलन घडून आले. हे आंदोलन उलनाद, जगदलपूर तहसील अंतर्गत पुर्व बस्तर मधील एका भागात घडून आले.

या संदर्भात लाला जगदलपुरी यांनी केलेले वर्णन या आदिवासी आंदोलनाचे स्वरुप स्पष्ट करते ते असे म्हणतात की 2 फेब्रुवारी 1910 मध्ये पुसवाल बाजारात लुटपाट करण्यात आली. इंग्रजांनी हे आंदोलन मोडून काढण्यासाठी मोठे प्रयत्न केले. आंदोलकावर गोळीबार करण्यात आले. नेत्यांना अटक करण्यात आली. तीर, कमान, भाले यांचा वापर करुन हिंसक आंदोलन घडवून आणले. ब्रिटिशांनी 25 मार्च 1910 रोजी मोठा प्रतिकार करुन या आंदोलनाची व्रिवता समाप्त केली.

**समारोप :** 'युमकाल' या ग्रंथात सुधीर सक्सेना यांनी बस्तरमधील आदिवासी चळवळीचे विवेचन केले आहे. बस्तर चळवळ अन्य आदिवासी चळवळीपेक्षा वेगळी होती. ब्रिटिश अत्याचार, शोषण या विरुध्द ही चळवळी होती. ही चळवळ संघटीत होती आणि ब्रिटिशांना धडा शिकवणे हा या चळवळीचा उद्देश होता. अरण्यसंस्कृतीचे जतन करणे, उपनिवेशवादाला विरोध करणे, साम्राज्यवादी शक्तीला विरोध करणे हे उद्देष बस्तरमधील आदिवासी चळवळीचे होते. मात्र ब्रिटिशांच्या महाशक्तीपुढे ही चळवळ तग धरु शकली नाही.

***संदर्भसूची :***

1. *Devi Uma, (2001) Economic and Political Weekly, Sameeksha Trust, Mumbai.*
2. *श्रीलता स्वामीनाथन, ;2001, आधी जमीन, समकालीन प्रकाषन, पाटणा.*
3. *Sinha Surjeet, (2002) Social Movements and the State, Social Movement in India (Ed.) M.S. Rao, Manohar Publication, New Delhi.*
4. *Thapar Romesh (Ed), 2010 Tribe caste and Religion in India, Macmillan, New Delhi.*
5. *बी.आर.नंदा, ;2010द्ध आझादी आंदोलन और आदिवासी आंदोलन oxford University Press, New Delhi.*